सं.फौ.प्र.क्र.६/२०२१
सरकार -वि- विजय
**निशाणी क्र.१० खाली**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - पवन कडुबा शेळके,
वय - २९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. - वाकोडी, ता. मलकापूर, जि. बुलढाणा.

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

१. पोलीसांनी मला कुठेही बोलावले नव्हते. माझ्यासमोर पोलीसांनी पंचनाम्याची कोणतीही कार्यवाही केली नव्हती. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर मला माहीत नाही. सही **निशाणी क्र.१६** देण्यात येतो.

*(साक्षीदार हा अभियोगपक्षाला सहकार्य करत नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या तोंडी विनंतीवरुन सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी कलम १५४ भारतीय पुरावा कायदा नुसार देण्यात येत आहे.)*

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०७.१२.२०२० रोजी पोलीसांनी मला आरोपीच्या घरासमोर बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातून एक ओबडधोबड दगड ज्याचे वजन अंदाजे १ किलो जप्त केला व त्याचा पंचनामा करुन त्यातील मजकुर मला वाचून दाखविला व मी त्यावर सही केली. मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याला ओळखत असल्यामुळे आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.वानखेडे यांच्यामार्फत-**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक :१२/०५/२०२६.

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2026.05.12 00:15:01 +0530

( पी.एस. ठाकरे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कोर्ट क्र. १, मलकापूर